09-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/08/2025 11:24 PM Page 1




रुग्णालयातील बंद असलेले लिफ्ट सुरू
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारत-इंग्लंड आज दुसरा वनडे
पान ४ वर

वेर्णा, रविवार, ९ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 157 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 9 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# दिल्लीत 'कमळ', आपचे पानीपत

## केजरीवालांना मोठा धक्का | काँग्रेसचा सुपडा साफ

**नवी दिल्ली, दि. ८ : संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने तब्बल २७ वर्षांनी दिल्लीत कमळ फुलवले आहे. तसेच आम आदमी पक्षाच्या १0 वर्षांच्या साम्राज्याला जनतेने उलथवून लावले. धक्कादायक बाब म्हणजे आपचे तीन मोठे नेते म्हणजेच माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, माजी मंत्री सत्येंद्र जैन यांचा पराभव यांना पराभवाचा धक्का बसला आहे. मुख्यमंत्री आतिशी मार्लेना या विजयी झाल्या आहेत. मात्र, आपला तिसऱ्यांदा आपली सत्ता आणण्यात यश आलेले नाही. त्यामुळे आपची सत्ता जाण्यापेक्षाही अरविंद केजरीवाल यांचा पराभव होणे, हा पक्षासाठी सर्वात मोठा धक्का आहे. भाजपाचे परवेश वर्मा यांनी केजरीवालांना पराभवाचे धक्का दिल्याने ते आता जायंट किलर उमेदवार ठरले आहेत. तर काँग्रेसला एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही. त्यामुळे २0२0 प्रमाणेच आताही त्यांना भोपळा फोडता आलेला नाही.**

या निवडणुकीत भाजपाने अभूतपूर्व यश मिळवले. एकूण ७० जागांपैकी भाजपाला ४८ जागा मिळाल्या आहेत. तर आम आदमी पार्टीला फक्त २२ जागांवर विजय मिळाला आहे. विशेष म्हणजे कधीकाळी सत्तेत असलेल्या काँग्रेस पक्षाला या निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून आपचे अरविंद केजरवील आणि भाजपच्या परवेश वर्मा यांच्यात लढत झाली होती. यामध्ये परवेश वर्मा यांनी १८४४ मतांनी विजयी मिळवला आहे. त्यामुळे जायंट किलर म्हणून परवेश वर्मा यांच्याकडे पाहिले जात आहे. अरविंद केजरीवाल यांचे निकटवर्तीय आणि दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचाही पराभव झाला आहे. जंगपुरा मतदारसंघातून ते निवडणूक लढवत होते. अवघ्या ६00 मतांनी भाजपाच्या तरविंदर सिंह मारवाह यांनी सोसिदियांना पराभूत केले.

गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये दिल्लीकरांनी आम आदमी पक्षाला भरभरुन मतदान केले. पण त्याच दिल्लीकरांनी आता भाजपच्या झोळीत मतांचे दान

पान २ ▶



### राष्ट्रवादीचे डिपॉझिट जप्त

या निवडणुकीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने देखील आपले नशिब आजमवले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तब्बल २३ उमेदवारांना निवडणुकीच्या मैदानात उतरवले होते. पण त्यापैकी सर्वांचा दारूण पराभव झाला आहे. या उमेदवारांचा फक्त पराभव झाला नाही तर त्यांचे डिपॉझिट देखील जप्त झाले आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला दिल्लीत केवळ 0.0३ टक्के मते मिळाली आहेत. जुलै २0२३ मध्ये अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे विभाजन झाल्यानंतर दिल्लीतील ही पहिलीच विधानसभा निवडणूक होती.

> मी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करतो. मला आशा आहे की विजय उमेदवार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करतील. गेल्या १0 वर्षांत जनतेसाठी केलेले काम त्यांच्यासमोर आहे. जनतेचा निर्णय आम्ही मान्य करतोय. आम्ही आता सक्षम विरोधी पक्षाची भूमिका बजावू. आम्ही सत्तेसाठी राजकारणात आलो नाही.. तसेच या निवडणुकांमध्ये उत्तम काम केल्याबद्दल मी आम आदमी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो.
>
> – अरविंद केजरीवाल
> दिल्लीचे माजी मुख्यमंत्री

# मोदी साहेब ! जरा केबल कटिंग मोहीम थांबवा...

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ८ :** वीज विभागाकडून सुरू असलेली बेकायदा केबल कटींग मोहीम थांबवा, अशी विनंती गोव्यातील पालकांनी चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या अंतिम परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गंभीर व्यत्यय येत असल्याचे कारण या पत्रात देण्यात आले आहे.

पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात, संबंधित पालकांनी वीज खांबांवरील केबल काढून टाकण्यापूर्वी सरकारला विभागांमध्ये योग्य समन्वय सुनिश्चित करण्याची विनंती केली आहे. त्यांनी व्यवहार्य तोडगा निघेपर्यंत, विशेषतः चालू परीक्षेच्या कालावधीचा विचार करता, अशा कृती स्थगित करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. पुढील व्यत्यय टाळण्यासाठी पालकांनी शिक्षण संचालनालय, माहिती तंत्रज्ञान विभाग (आयटी) आणि वीज विभाग यांच्यात त्वरित संवाद साधण्याची मागणी केली आहे. त्यांनी शिक्षणाच्या सातत्य आणि भविष्यातील कोणत्याही व्यत्ययाला कमी करण्यासाठी उपाययोजनांबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि आश्वासने देखील मागितली आहेत.

याबाबत शिक्षणतज्ज्ञ विल्मा नतालिया कार्डोसो ई फर्नांडिस यांनी विशेषतः कोविड-१९ साथीच्या आजारानंतर ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्मवरील वाढत्या अवलंबित्वावर प्रकाश टाकला. राज्यातील विद्यार्थी अभ्यास साहित्य मिळविण्यासाठी, ऑनलाइन वर्गांना उपस्थित राहण्यासाठी आणि असाइनमेंट सबमिट करण्यासाठी स्थिर इंटरनेट कनेक्शनवर अवलंबून आहेत. अलिकडच्या केबल कट करण्याच्या मोहिमेमुळे या सेवांवर गंभीर परिणाम झाला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेची तयारी करण्यात अडचणी येत आहेत, असे त्या म्हणाल्या .

फर्नांडिस यांनी भर दिला की हे व्यत्यय एका महत्त्वाच्या वेळी आले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीत अनिश्चितता वाढली आहे. शिक्षक म्हणून, आमच्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यात आम्हाला प्रचंड आव्हानांचा सामना करावा लागत आहे, ज्यापैकी बरेच जण त्यांच्या शिक्षण आणि परीक्षांसाठी पूर्णपणे या ऑनलाइन प्रणालींवर अवलंबून आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस यांच्यासह पालकांनी इशारा दिला आहे की जर या समस्येवर तातडीने लक्ष दिले नाही तर अधिकाऱ्यांकडे योग्य परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना सामान्य पदोन्नती किंवा उत्तीर्ण प्रमाणपत्रे देण्याशिवाय पर्याय

पान २ ▶

## निवडक

### भारताकडून पाकच्या ७ घुसखोरांचा खात्मा

**पुंछ, दि. ८ :** भारतीय सैन्याने ७ पाकिस्तानी घुसखोरांना ठार मारले आहे. यामध्ये ३ पाकिस्तानी लष्करी सैनिकांचाही समावेश आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुंछ जिल्ह्यातील कृष्णा घाटीजवळ नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न झाला तेव्हा ही घटना घडली. भारतीय सैन्याच्या पुढच्या चौकीवर हल्ला करण्याची योजना होती. भारतीय सैन्याला याची माहिती मिळाली आणि त्यांनी आधीच हल्ला करून कट उधळून लावला. घुसखोरीदरम्यान मृत्युमुखी पडलेल्या ७ जणांमध्ये पाकिस्तानच्या बॉर्डर ॲक्शन टीम (बॅट) चे ३-४ सदस्यही मृत्युमुखी पडले. ही टीम सीमापार ऑपरेशन्समध्ये माहिर आहे. या कारवाईत मारले गेलेले दहशतवादी अल बद्र गटाचे सदस्य असू शकतात, असे सूत्रांनी सांगितले. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी आधीच सांगितले आहे की आम्ही भारतासोबतचे सर्व प्रश्न चर्चेद्वारे सोडवू, अशा वेळी घुसखोरीचा हा प्रयत्न करण्यात आला आहे.

---

### तीन इस्त्रायलींची हमासकडून सुटका

**इस्त्राईल, दि. ८ :** इस्त्राईल हमासमध्ये संघर्ष विराम झाल्यानंतर दोन्हीकडील बाजूंनी ओलिसांची हळूहळू सुटका केली जात आहे. शनिवारी हमासने त्यांच्या ताब्यात असलेल्या ३ इस्त्रायली नागरिकांची सुटका केली. एली शराबी, ओहद बेन अमी, आणि लेवी अशा या सुटका केलेल्या नागरिकांची नावे आहेत. या ओलिसांना हमासने रेडक्रॉस संघटनेकडे सोपविले आहे. आता यांना गाझापट्टीतून इस्त्रायला घेऊन जाणार आहेत. आता या तीन बंधकांना मुक्त केल्यानंतर १८३ पॅलेस्टिनी बंधकांना इस्त्राईल मुक्त करणार आहे. इस्त्राईल व हमास मध्ये १९ जानेवारीला शस्त्रबंदी झाली आहे. तेव्हापासून आतापर्यंत दोन्ही बाजूंकडून पाचवी अदलाबदली झाली आहे. यामध्ये १६ इस्त्रायली तर ५ थाई बंधकांची सुटका झाली आहे. ७ ऑक्टोबर २0२३ मध्ये हमास संघटनेने इस्त्रायलवर हमला केला होता. यावेळी त्यांनी १२00 लोकांनी ओलिस ठेवले होते. यानंतर इस्त्रायचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांनी हमासविरोधात युद्ध छेडले होते.

---

### नवे आयकर विधेयक येत्या आठवड्यात

नवी दिल्ली, दि. ८ : येत्या आठवड्यात लोकसभेत नवे आयकर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. मला आशा आहे की पुढील आठवड्यात आयकर विधेयक लोकसभेत मांडले जाईल आणि नंतर ते संसदीय समितीकडे पाठवले जाईल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. याबाबत सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि संसदेने ते मंजूर केल्यानंतर नवीन विधेयक कधी लागू करायचे? यावर सरकार निर्णय घेईल. दरम्यान, आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, केंद्र सरकार कर्ज सुविधा सुलभ करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या निच्चांकी घसरणीच्या पार्श्वभूमीवर ते म्हणाले की, रुपयाबाबत आरबीआयच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. आरबीआयचे याबाबत कोणतेही विशिष्ट असे लक्ष्य नाही. आम्ही वित्तीय क्षेत्राला तरलता प्रदान करण्यासाठी तत्पर आणि सक्रिय राहू असे आरबीआय गव्हर्नर मल्होत्रा यांनी नमूद केले आहे.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८0 (१0 ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१00 (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९0 ↑ (८३.९५)

# मडगावच्या पदपथांवर अतिक्रमणे सुरूच

## रहिवाशांची कारवाईची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. ८ :** अधिकाऱ्यांच्या वारंवार निर्देशांनंतरही, मडगावमधील पदपथांवर अतिक्रमणे सुरूच आहेत, दुकानदार आणि विक्रेते पादचाऱ्यांच्या जागांवर कब्जा करत आहेत. अतिक्रमणांच्या वाढत्या संख्येमुळे जनतेला मुक्तपणे फिरण्यासाठी जागा उरली नाही, ज्यामुळे पादचाऱ्यांना गर्दीच्या रस्त्यांवर चालावे लागत आहे आणि त्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

रहिवाशांनी या समस्येवर वाढती निराशा व्यक्त केली आहे आणि मडगाव नगरपरिषद (एमएमसी) कडून सार्वजनिक प्रवेश रोखण्यासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. स्थानिकांनी या बिघडत्या परिस्थितीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

एमएमसीच्या एका अधिकाऱ्याने आश्वासन दिले की या बेकायदेशीर अतिक्रमणांमध्ये सहभागी असलेल्या विक्रेते आणि दुकान मालकांवर कारवाई केली जाईल. ही एक वारंवार येणारी समस्या बनली आहे, विशेषतः व्यावसायिक क्षेत्रात जिथे पदपथ पूर्णपणे बंद आहेत. पादचाऱ्यांना रस्त्यावर चालण्याशिवाय पर्याय उरला नाही, असे रहिवासी रोहन बोरकर म्हणाले.

बोरकर यांनी पुढे नमूद केले की, महापालिका नियमित अंमलबजावणी मोहिमा राबविण्यात अपयशी ठरल्यामुळे अतिक्रमणाची समस्या गंभीर चिंतेचा विषय बनली आहे. अनेक स्थानिकांचा असा युक्तिवाद आहे की, महानगरपालिकेकडे अतिक्रमणांवर कारवाई करण्यासाठी एक समर्पित विभाग असला तरी, तक्रारी आल्यानंतरच कारवाई केली जाते.भविष्यात होणाऱ्या उल्लंघनांना रोखण्यासाठी दुकान मालकांवर कठोर दंड आकारण्यासह या बेकायदेशीर बांधकामांना हटविण्यासाठी सतत प्रयत्न करण्याची मागणी रहिवासी करत आहेत. अतिक्रमण केवळ पादचाऱ्यांच्या हालचालींना प्रतिबंधित करत नाही तर वाहतूक कोंडीतही भर घालत आहे, कारण पदपथ व्यावसायिक क्रियाकलापांसाठी वाढत्या प्रमाणात ताब्यात घेतले जात आहेत.

आणखी एक रहिवासी मेनिनो डायस यांनी निदर्शनास आणून दिले की अनेक स्थानिक नसलेले विक्रेते रस्त्याच्या कडेला आणि पदपथांवर व्यवसाय करत आहेत, तरीही अधिकाऱ्यांनी फारशी कारवाई केलेली नाही.

प्रतिसादात, महानगरपालिकेच्या

पान २ ▶

# नावेली जंक्शनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी

▶ **कायमस्वरूपी उपाययोजन करण्याची रहिवाशांची मागणी**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. ८ :** नावेली जंक्शनवरील सततच्या वाहतूक कोंडीमुळे निराश झालेल्या रहिवाशांनी आणि प्रवाशांनी अधिकाऱ्यांना गर्दीच्या वेळी वाहतूक वळवण्यासह कायमस्वरूपी उपाय लागू करण्याची विनंती केली आहे.शाळेच्या वेळेत वाहतूक पोलिसांची उपस्थिती असूनही, स्थानिकांचा असा दावा आहे की परिस्थिती गोंधळाची आहे, जड वाहनांमुळे गर्दी वाढत आहे. असंख्य तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, परंतु अद्याप प्रभावी उपाययोजना अंमलात आणल्या गेल्या नाहीत, असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

नावेली चर्चजवळ अलिकडेच झालेल्या वाहतुकीच्या अडथळ्यात वाहने थांबलेली दिसून आली, ज्यामुळे शालेय मुलांसह पादचाऱ्यांनाही कोंडीतून मार्ग काढावा लागला. वाहतूक साइनबोर्ड नसल्याबद्दल स्थानिकांनीही चिंता व्यक्त केली आहे, ज्यामुळे वाहनचालक आणि पर्यटक दिशा विचारण्यासाठी वारंवार थांबतात.

गर्दीच्या वेळी येथील परिस्थिती अस्वीकार्य आहे, असे स्थानिक रहिवासी फ्रान्सिस मेनेझेस म्हणाले. योग्य वाहतूक व्यवस्थापनाच्या अभावामुळे गर्दीच्या वेळेत वाहतूक कोंडी प्रवाशांसाठी दुःस्वप्न बनली आहे. सुव्यवस्था आणण्यासाठी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची उपस्थिती आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. अधिवक्ता प्रतिमा कुतिन्हो यांनी कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी प्रतिपादित केली आणि सांगितले की रुग्णवाहिका देखील अनेकदा स्पष्ट रस्ता नसल्याने अडकतात.

तात्पुरत्या उपाययोजना म्हणून, अधिकाऱ्यांनी गर्दीच्या वेळी वेस्टर्न बायपासवरून वाहतूक वळवण्याचा विचार करावा, असे कुतिन्हो यांनी सुचवले, अधिकाऱ्यांनी या समस्येला पुरेसे गांभीर्याने घेतलेले नाही.रहिवासी आता दैनंदिन वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाईची वाट पाहत आहेत.

# तंत्रज्ञान विकासात चीन – अमेरिकेत काटे की टक्कर सुरू!

## अनेक निर्बंध लादूनही चीनची तंत्रज्ञानात गरुडझेप



**वुहान, दि. ८ :** चीनच्या चॅटबॉट डीपसीकने जगाला चकित केले आहे. पण चीनवर लक्ष ठेवणाऱ्यांसाठी यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.चीन गेल्या १0 वर्षांपासून 'एआय' सह उच्च तंत्रज्ञान उत्पादनांमध्ये हळूहळू प्रभुत्व मिळवत आहे. चीनच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'मेड इन चायना २0२५ ' योजनेचा हा भाग आहे.डीपसीक हे या ग्रँड प्रोजेक्टच्या यशाचे उदाहरण म्हटले जात आहे.

२0१५ मध्ये चीन सरकारने 'मेड इन चायना २0२५ ' योजना जाहीर केली होती.दररोज वापरल्या जाणाऱ्या लाखो वस्तूंमध्ये उच्च दर्जाचे आणि उच्च तंत्रज्ञानाचे वर्चस्व प्रस्थापित करणे ही त्यामागची कल्पना होती.सन २0२५ पर्यंत या बाबतीत आघाडीवर राहण्याच्या कल्पनेने, चीनने तंत्रज्ञान उद्योगातील १0 क्षेत्रे निवडली आणि ' एआय ' , क्वांटम कॉम्प्युटिंग, इलेक्ट्रिकल कार, अक्षय ऊर्जा आणि बॅटरी तंत्रज्ञान यांना स्थान देण्यात आले.

काही क्षेत्रात चीनने मोठे यश मिळवले आहे. जर्मनी, जपान आणि अमेरिकेला मागे टाकत चीन कार विकण्यात आघाडीवर आहे. ईव्हीचे यश चीनशी जोडलेले आहे आणि तो जगातील सर्वात मोठा बॅटरी उत्पादक देश बनला आहे.

इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीच्या मते, चीन जगभरातील ८0 ते ९५ टक्के सौर पॅनेल अक्षय ऊर्जेसाठी निर्यात करतो.संशोधकांचा असा विश्वास आहे की २0२८ पर्यंत चीन अक्षय ऊर्जेचे पॉवर हाऊस बनेल आणि जगभरातील अक्षय ऊर्जेमध्ये चीनचे योगदान सुमारे ६0 टक्के असेल.ड्रोनच्या बाबतीतही चीन आघाडीवर आहे. बीसीसी संशोधनानुसार, शेन्झेन स्थित 'डीजिआय' कडे जागतिक स्तरावर ड्रोनची ७0 टक्के बाजारपेठ आहे. जगातील १0 सर्वात मोठ्या ड्रोन उत्पादकांपैकी तीन चीनचे आहेत.आपले ध्येय साध्य करण्यासाठी, चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने रोडमॅपद्वारे २५0 उद्दिष्टे निश्चित केली आहेत. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार, चीनने यापैकी सुमारे ८६ टक्के उद्दिष्टे पूर्ण केली आहेत.यूएस काँग्रेस रिसर्चनुसार, चीन सरकारने संशोधन, विकास आणि परदेशी कंपन्यांच्या खरेदीसाठी १.५ ट्रिलियनचे अनुदान बाजूला ठेवले आहे.

'मेड इन चायना २0२५ ' इतका यशस्वी झाला आहे की काही वर्षांतच सरकारने विरोधकांचा पराभव करत असल्याचे सांगणे बंद केले.पण यालाही खूप उशीर झाला आहे कारण अलीकडेच अनेक पाश्चात्य देशांनी चीनकडून तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे.विकासाचा वेग कमी करण्यासाठी ही योजना होती आणि मायक्रोचिपच्या बाबतीत ते काम करत असल्याचे दिसते.परंतु काही विश्लेषकांचा असा विश्वास आहे की काही निर्बंधांमुळे चीनला प्रेरणा मिळाली असेल आणि 'मेड इन चायना २0२५ ' हे अधिक स्वावलंबी होण्याचे साधन बनले आहे.

पान २ ▶